साप्ताहिक

''एकच ध्येय... एकच आवाज''

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक १८ वा | सोमवार, दि. १८/०५/२०२६ ते दि. २४/०५/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## धुळ्यात काँक्रिट रस्त्यांसह टप्प्याटप्प्याने भरीव विकासकामांना प्राधान्य–आ. अनुप अग्रवाल

### शिवाजी रोडच्या काँक्रिटीकरणाचे भूमिपूजन



धुळे – शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांच्या काँक्रिटीकरणासह विविध भरीव व दर्जेदार कामांतून धुळे शहराच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. शहरातील रस्त्यांवर आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे व्हाइट टॉपिंग काँक्रिटीकरणासाठी शासनाकडून कोटचवधी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. यातून धुळे महानगर स्मार्ट आणि सुंदर करण्याचा प्रयत्न सुरू आहे. यासाठी धुळेकर जनतेनेही साथ द्यावी, असे आवाहन शहराचे आमदार अनुपभय्या अग्रवाल यांनी केले.

आमदार अग्रवाल यांच्या हस्ते आज सायंकाळी शहरातील पांझरा नदीकाठावरील शिवाजी महाराज रोडवरील श्री सिद्धेश्वर गणपती मंदिर ते श्री स्वामी समर्थ केंद्रापर्यंतच्या व्हाइट टॉपिंग रस्ता काँक्रिटीकरणाचे भूमिपूजन झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महापौर मायादेवी परदेशी, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, उपमहापौर ज्योत्स्ना पाटील, महापालिकेतील भाजपच्या गटनेत्या किरण कुलेवार, माजी महापौर तथा नगरसेविका कल्पना महाले, नगरसेवक सुनील बैसाणे, नगरसेवक ललित आरुजा, नगरसेवक रोहित चांदोडे, भिकन वराडे, महादेव परदेशी, प्रफुल्ल पाटील, धीरज जगताप, मयूर ठाकरे, सागर चौधरी, महापालिकेचे शहर अभियंता चंद्रकांत उगले, कनिष्ठ अभियंता प्रणव शिंदे, ठेकेदार मिलिंद मुडावदकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार अग्रवाल म्हणाले, की श्री सिद्धेश्वर गणपती मंदिर ते श्री स्वामी समर्थ केंद्र ते महात्मा गांधी पुतळा, तसेच झाशी राणी पुतळा ते अग्रवाल विश्राम भवनापर्यंतच्या व्हाइट टॉपिंग काँक्रिटीकरणाच्या कामासाठी पाच कोटी ४८ लाख ८६ हजार ९६७ रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. नागरी दलितेतर वस्ती सुधार योजनेंतर्गत आजपासून हे काम सुरू होत आहे. याच बरोबर श्री सिद्धेश्वर गणपती मंदिर ते संतोषा माता चौकापर्यंतच्या रस्त्याच्या व्हाइट टॉपिंग काँक्रिटीकरणासाठीही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतून दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. तसेच शहरातील साक्री रोडवरील संतोषी माता मंदिर चौक ते मोगलाई परिसरातील सुंदरमाधव हॉस्पिटलपर्यंतच्या रस्त्याची काँक्रिटीकरणासाठीही राज्य शासनाने यंदाच्या अर्थसंकल्पात ५ कोटी रुपयांची तरतूद केली असून, तर पारोळा रोडवरील शेतकरी पुतळा ते दाता सरकार मंगल कार्यालयापर्यंतच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यासाठी दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला आहे.

वाहतूक कोंडीची समस्या सुटणार

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते महात्मा गांधी पुतळ्यापर्यंतच्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी अर्थसंकल्पात २५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या मार्गावरील भूमिगत गटारीचे काम पूर्ण झाल्यानंतर महिनाभराने हे कामही सुरू होईल. ही सर्व कामे टप्प्याटप्प्याने सुरू केली जात आहेत. जेणेकरून शहरातील वाहतुकीला अडथळा येणार नाही. या रस्त्यांच्या कामांमुळे शहरातील मुख्य बाजारपेठेसह अन्य भागांतील वाहतूक कोंडीची समस्या सुटण्यास मदत होईल, असा विश्वासही आमदार अग्रवाल यांनी व्यक्त केला.

## तांत्रिक घोळामुळे दिव्यांग बांधवांची पेन्शन रखडली तात्काळ तोडगा न काढल्यास आंदोलनाचा इशारा–महेश काटकर

धुळे – संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या अंतर्गत राज्यातील हजारो दिव्यांग बांधवांची हक्काची पेन्शन तांत्रिक कारणांमुळे रखडली आहे. काही दिव्यांगांच्या खात्यात पैसे जमा झाले असले, तरी बहुतांश दिव्यांग बांधव अद्यापही मानधनापासून वंचित आहेत. शासनाच्या ढिसाळ कारभारामुळे आणि क्लिष्ट नियमांमुळे दिव्यांग बांधवांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असून, प्रशासनाने यावर तात्काळ तोडगा काढावा, अशी मागणी भाजप दिव्यांग विकास आघाडीचे माजी प्रदेश सदस्य महेश काटकर यांनी केली आहे.

काटकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, सध्या दिव्यांग बांधवांना पेन्शन मिळण्यात अनेक गंभीर अडचणी येत आहेत. शासनाने ही योजना 'दिव्यांग सक्षमीकरण विभागा'कडे वर्ग केल्यापासून डेटा हस्तांतरणात मोठ्या त्रुटी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे अनेक जुन्या व पात्र लाभार्थ्यांची नावे यादीतून गायब झाली आहेत. दिव्यांग बांधवांना भेडसावणाऱ्या मुख्य अडचणी:

बायोमेट्रिक आणि हयातीचा दाखला: दरवर्षी ऑनलाईन हयातीचा दाखला देणे बंधनकारक आहे. मात्र, अनेक दिव्यांग बांधवांचे हाताचे ठसे (बायोमेट्रिक) मॅच होत नसल्याने त्यांचे दाखले मंजूर होत नाहीत. बँक ई-केवायसी व आधार लिंकिंग: डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर (उद्दढ) च्या नियमांमुळे बँक खात्याला आधार लिंक असणे गरजेचे आहे. मात्र, बँकांकडून योग्य सहकार्य मिळत नसल्याने ग्रामीण भागातील दिव्यांगांचे आधार लिंकिंग प्रलंबित आहे. कार्यालयांचे हेलपाटे: पेन्शन का बंद झाली, याचे स्पष्ट कारण तहसील किंवा सेतू कार्यालयातून दिले जात नाही. त्यामुळे शारीरिक छळ सहन करत दिव्यांगांना सरकारी कार्यालया फेऱ्या माराव्या लागत आहेत.

महेश काटकर यांची प्रमुख मागणी – प्रशासनाने प्रत्येक तालुक्यात तात्काळ 'विशेष कॅम्प' (Special Camp) आयोजित करावेत. या कॅम्पच्या माध्यमातून दिव्यांगांचे हयातीचे



दाखले, बँक केवायसी आणि आधार लिंकिंग जागेवरच पूर्ण करून घ्यावे. ज्या तांत्रिक त्रुटी आहेत, त्या सरकारी पातळीवर दुरुस्त करून दिव्यांग बांधवांची सर्व थकीत पेन्शन एकाच वेळी त्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी. जर शासनाने यावर तातडीने पावले उचलली नाहीत, तर दिव्यांग बांधवांच्या न्याय्य हक्कासाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही काटकर यांनी दिला आहे.

## आर.सी.पटेल आय.एम.आर.डी. परीसंस्थेतील एम.एम.एस. च्या विद्यार्थ्यांचे सुयश

शिरपूर – कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नोव्हेंबर २०२५–२६ मध्ये घेण्यात आलेल्या प्रथम वर्ष एम.एम.एस. (कॉम्पुटर मानजमेंट) च्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित आय.एम.आर.डी. परिसंस्थेतील एम.एम.एस (कॉम्पुटर मानजमेंट) च्या विद्यार्थ्यांनी उज्वल कामगिरीची परंपरा पुढे चालवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. एम.एम.एस. (कॉम्पुटर मानजमेंट) प्रथम वर्षामधून परीसंस्थेतील पाटील जयश्री रोहिदास हिने ९.८२ सी.जी.पी.ए. व ८६.७३ टक्के गुण मिळवून परिसंस्थेत प्रथम क्रमांक, मोगल कविता हिलाल ९.०९ सी.जी.पी.ए. व ७७.४५ टक्के परिसंस्थेत द्वितीय क्रमांक, गिरासे जागृती नरेंद्र ९.०९ सी.जी.पी.ए. व ७५.८२ टक्के परिसंस्थेत तृतीय क्रमांक, पाटील निकिता सतीश ८.९१ सी.जी.पी.ए. व ७७.८२ टक्के परिसंस्थेत चतुर्थ क्रमांक, राजपूत लोकेश देवेंद्रसिंग ८.९१ सी.जी.पी.ए. व ७४.७५ टक्के परिसंस्थेत पाचवा क्रमांक, निकुंभ रोहिणी रमेश ८.९१ सी.जी.पी.ए. व ७२.७३ टक्के मिळवून परिसंस्थेत सहावा क्रमांक, सोनगडे दिपक जयराम ८.३६ सी.जी.पी.ए. व ६९.८२ टक्के गुण मिळवून परिसंस्थेत सातवा क्रमांक मिळविला. आय.एम.आर.डी. परिसंस्थेमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासक्रमासोबत करिअर मार्गदर्शन, स्किल डेव्हलपमेंट, सेल्फ मोटिवेशन तसेच जागतिक स्तरावरील नोकरीच्या संधी यांवर आधारित विविध वेबिनार आणि गेस्ट लेक्चर्स आयोजित करण्यात येतात. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडतो. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी विभागप्रमुख आणि शिक्षकांचेही महत्त्वपूर्ण योगदान असून, त्यांच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य होत आहे. या यशाबद्दल माजी शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, ट्रस्टी सौ. जयश्रीबेन पटेल, आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, सचिव राजगोपाल भंडारी, सर्व ट्रस्टी, परिसंस्थेच्या संचालिका **(पान ३ वर)**

## अपघात टाळण्यासाठी ब्लॅक स्पॉट निश्चित करून उपाययोजना कराव्यात–निवासी उपजिल्हाधिकारी पवार

धुळे (जिमाका) – जिल्ह्यातील रस्त्यावरील अपघात टाळण्यासाठी ब्लॅक स्पॉट निश्चित करून त्याठिकाणी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशा सुचना निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार यांनी दिल्या. जिल्हा रस्ता सुरक्षा समिती व गतिरोधक समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील सातपुडा सभागृहात संपन्न झाली. बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता आर.आर.पाटील, भारतीय राजमार्ग प्राधिकरणाचे अभियंता शिवाजी पवार, पोलीस उपअधीक्षक ज्ञानेश्वर जाधव, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.रविंद्र सोनवणे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल कदम, वाहतुक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत मोहळे आदी उपस्थित होते. **(पान ३ वर)**

# शेतकऱ्यांनी डिएपी खतावर अवलंबून न राहता पर्यायी खतांचा वापर करावा

धुळे (जिमाका) – येत्या खरिप हंगामामध्ये शेतकऱ्यांनी केवळ डिएपी खतावर अवलंबून न राहता बाजारामध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. मृद परिक्षण व जमिन आरोग्य पत्रिकेच्या आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली वापराकरीता महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. राज्यात लवकरच पेरणीस सुरुवात होणार असून डिएपी खताची शेतकऱ्यांकडून जास्त मागणी होत आहे. यामुळे शेतकऱ्यांनी डिएपी खतास पर्यायी खते वापरावीत. डिएपी खतामध्ये १८ टक्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद ही अन्न द्रव्य आहेत. डिएपी खताची कमतरता भरुन काढण्यासाठी पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरद युक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एसएसपी (सिंगल सुपर फॉस्फेट) या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून या मध्ये स्फुरद १६ टक्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामुळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे. डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डिएपीस चांगला पर्याय आहे.

एसएसपी बरोबरच संयुक्त खते जसे की एनपीके १०:२६:२६, एनपीके २०:२०:०:१३, एनपीके १२:३२:१६, व एनपीके १५:१५:१५ या खतांच्या वापरामुळे नत्र व स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य सुद्धा पिकांना उपलब्ध होते. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर केल्यास पिकांसाठी पोषक ठरतो. त्याचबरोबर टिएसपी या खतामध्ये ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्याची मात्रा असुन डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व टिएसपी एक गोणी या खतांचा वापर केल्यास तो देखिल डिएपी खतास उत्तम पर्याय आहे. येत्या खरिप हंगामामध्ये शेतकऱ्यांनी केवळ डिएपी खतावर अवलंबून न राहता बाजारामध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करावा असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

# ‘ज्ञानभारतम्’ प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिम

## हस्तलिखित वारशाचे जतन, संवर्धन व डिजिटलायझेशनचा व्यापक उपक्रम

## नागरिक, संस्था आणि संशोधकांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन

धुळे (जिमाका) – देशाला प्राचीन हस्तलिखितांचा समृद्ध वारसा लाभलेला असून विविध विषयांवरील ज्ञान पिढ्यान् पिढ्या हस्तलिखितांच्या माध्यमातून जतन होत आले आहे. ही हस्तलिखिते देशभरात विखुरलेल्या अवस्थेत असल्यामुळे त्यांच्या संरक्षण, संवर्धन आणि अभ्यास मर्यादित राहिले आहे. या हस्तलिखिताचे अमूल्य ज्ञानसंपदेचे जतन करून ती एकत्रित स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाने ‘ज्ञानभारतम’ प्रकल्प सुरू केला आहे. या उपक्रमात नागरिक, संस्था आणि संशोधकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन सहायक धर्मादाय आयुक्त आर. एस. कानडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

भारताच्या विशाल ज्ञान व संस्कृती संबंधित हस्तलिखित वारशांचे जतन, डिजिटायझेशन आणि प्रसार करणे आणि भावी पिढ्यांसाठी सर्व हस्तलिखितांचे एकत्रित दस्तऐवजीकरण करून त्यांना डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देणे, त्यांचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन करणे तसेच जागतिक स्तरावर भारतीय ज्ञानपरंपरेचा प्रसार करणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह निर्माण करुन ती राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर अभ्यासक, संशोधक व सर्वसामान्य नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. या देशव्यापी सर्वेक्षण मोहिमेमध्ये किमान ७५ वर्ष जुनी , सर्व भाषा व लिपीमधील हस्तलिखितांचे जतन, डिजिटायझेशन आणि प्रसार करण्यात येणार आहे. यामुळे भारतीय ज्ञानपरंपरेचा व्यापक प्रसार होऊन संशोधनाला चालना मिळणार आहे. या उपक्रमात हस्तलिखितांची मालकी संबंधित संस्था, ग्रंथालये किंवा खासगी संग्राहक यांच्याकडेच कायम राहणार आहे. या अमूल्य ज्ञानवारशाचे जतन करण्याच्या कार्यात नागरिक, संस्था आणि संशोधकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा. अधिक माहितीसाठी अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पिंगळे कॉम्प्लेक्स, साक्री रोड, मोगलाई, धुळे ४२४००१ दूरध्वनी क्रमांक ०२५६२–२४५७४४ ईमेल supdtest.dhl-mhgov.in यावर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक धर्मादाय आयुक्त श्री. कानडे यांनी केले आहे.

# छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त जिल्हा प्रशासनातर्फे अभिवादन



धुळे (जिमाका) – छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने जिल्हा प्रशासनातर्फे जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, उपजिल्हाधिकारी संजय बागडे,संदीप पाटील, तहसिलदार प्रवीण चव्हाणके , नगरपालिका प्रशासन अधिकारी अभिजित बाविस्कर, नायब तहसीलदार मायानंद भामरे, सहायक महसूल अधिकारी विजय बावा यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# तांत्रिक चुकीने नाशिक विभागात नावे नोंदली गेलेल्या शिधापत्रिकाधारकांसाठी दुरुस्तीची पुन्हा एकदा संधी

## धुळे तहसीलमध्ये अर्ज करण्याचे आमदार अनुपभैय्या अग्रवाल यांचे आवाहन

धुळे– शहर परिसरातील शिधापत्रिकेतील ज्या व्यक्तींची नावे तांत्रिक चुकीने अथवा अन्य कोणत्याही कारणाने नाशिक विभागात ऑनलाइन दिसत आहेत अशा व्यक्तींना त्यांची नावे पुन्हा एकदा धुळे जिल्हा पुरवठा विभागाकडे स्थलांतरित करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. ज्या व्यक्तींची नावे शिधापत्रिकेत आहेत पण ती ऑनलाइन नाशिक विभागात दाखवली जात आहेत, अशा व्यक्तींनी धुळे ग्रामीणच्या तहसीलदारांच्या नावाने अर्ज करून आपल्या आधार कार्डच्या झेरॉक्स प्रतीसह आपले अर्ज १८ मे ते २२ मे २०२६ दरम्यान धुळे ग्रामीणच्या तहसील कार्यालयातील टपाल शाखेत जमा करावेत, असे आवाहन आमदार अनुपभय्या अग्रवाल यांनी केले आहे.

दरम्यान, या कार्यवाहीसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नसून, ही सर्व प्रक्रिया मोफत केली जाणार आहे. धुळे शहरात वास्तव्यास असलेल्या अनेक कुटुंबांतील काही सदस्यांची नावे त्यांच्या शिधापत्रिकेत दिसतात. मात्र, ऑनलाइन पडताळणीत त्यांची नावे तांत्रिक चुकीने अथवा अन्य कोणत्याही कारणाने नाशिकच्या जिल्हा पुरवठा विभागात नोंदली गेल्याचे दिसून येत आहे. यामुळे धुळे शहरातील अनेक कुटुंबांतील सदस्यांना स्वस्त धान्य व शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्याचे चित्र आहे. एवढेच नव्हे तर ऑनलाइन शिधापत्रिकेत ही नावे नाशिकला स्थलांतरित झाल्याचे दाखवत असल्याने अशा व्यक्तींना केंद्र शासनाच्या आयुष्यमान कार्ड व आभा कार्डची नोंदणी करण्यातही अनंत अडचणी येत आहेत. त्यामुळे त्यांना आरोग्याच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यापासूनही वंचित राहावे लागत आहे. याबाबत अनेक नागरिकांच्या तक्रारी वाढत आहेत.

या पार्श्वभूमीवर धुळे जिल्हा पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली असून, धुळे ग्रामीणच्या तहसील कार्यालयामार्फत ही नावे पुन्हा धुळे जिल्हा पुरवठा विभागाकडे नोंदणी करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. यासाठी ज्या व्यक्तींची नावे शिधापत्रिकेत आहेत, परंतु ती ऑनलाइन नाशिक विभागात दाखविली जात आहेत, अशा व्यक्तींनी १८ मे ते २२ मे २०२६ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी पाच या वेळेत धुळे ग्रामीणच्या तहसील कार्यालयातील टपाल शाखेत आपल्या आधार कार्डच्या झेरॉक्स प्रतीसह आपले अर्ज जमा करावेत. हे अर्ज जमा केल्यानंतर धुळे शहर व जिल्हा पुरवठा विभागातर्फे योग्य ती पडताळणी करून संबंधित कुटुंबातील त्या– त्या सदस्यांची नावे नोंदवून अडचणी दूर करण्याबाबत तत्काळ कार्यवाही करण्यात येणार आहे. यापूर्वीही गेल्या वर्षी सुमारे ५०० हून अधिक व्यक्तींची चुकून नाशिक पुरवठा विभागात नोंदविली गेलेली नावे पुन्हा धुळे पुरवठा विभागात समाविष्ट करण्यात आली होती. आता पुन्हा तशी संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नसून, सर्व प्रक्रिया मोफत केली जाणार आहे. या संधीचा संबंधित व्यक्तींनी लाभ घेत धुळे ग्रामीण तहसील कार्यालयात आपल्या आधार कार्डच्या झेरॉक्स प्रतींसह अर्ज जमा करावेत. यासंबंधी काही अडचणी आल्यास एबी फाउंडेशनचे समन्वयक दत्तात्रय पारखे (मोबाईल– ९११२२२९२३८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही आमदार अनुपभय्या अग्रवाल यांनी केले आहे.

# पर्यावरण वाचवा

विशेष लेख...

पृथ्वीवर सर्वात बुद्धीन जर कोणी असेल तर तो मानव. त्यामुळे त्याने आपल्या बुद्धीमत्तेचा वापर करून पर्यावरणाकडून जसा पाहिजे तसा आपला विकास साधून घेतला. मात्र परतफेड करण्याचे साफ विसरला. एखाद्या व्यक्तीकडून वा समाजाकडून जेव्हा आपण मदत घेतो तेव्हा त्याच्या प्रती नेहमी कृतज्ञ राहतो, कधीही कृतघ्न होत नाही. हा नियम पर्यावरणाशी मानवाने कधीच पाळला नाही. त्यामुळे आज ''पर्यावरण वाचवा' यासारखी वाक्ये कानी पडत आहेत.

जगातील लोकांच्या मनात पर्यावरणविषयी जाणीव जागृती निर्माण व्हावी. पर्यावरणाचा र्‍हास थांबावा या उद्देशाने दि.५ जून हा दिवस जगात ''पर्यावरण दिन'' म्हणून साजरा केला जातो. पर्यावरणाविषयी खूप काही जागृती केल्यावर सुद्धा मानवाच्या वर्तनात किंचीतसुद्धा परिवर्तन झाले नाही, बदल झाला नाही. ही फारच काळजी करण्यासारखी आणि भविष्यात चिंतेची बाब आहे. जगप्रसिद्ध पर्यावरण तज्ज्ञ डॉ. रास, पर्यावरण बद्दल म्हणतात की, 'मानवी जीवनावर परिणाम करणारी कोणतीही बाह्यशक्ती म्हणजे पर्यावरण होय.' वनस्पतीपासून प्राण्यांपर्यंत सगळ्यांच्याच जीवनावर या पर्यावरणाचा प्रभाव आढळून येतो. पर्यावरणाशी जो योग्य प्रकारे समन्वय साधतो तोच या पर्यावरणात जिवंत राहू शकतो. मानवी जीवन सुद्धा याला अपवाद नाही. पर्यावरणाने मानवाला अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन मूलभूत सोयीसह अन्य अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. परंतु मानवाच्या स्वार्थी, अज्ञानी, बेदरकारी, अडाणी, बेफिकीर, निर्धास्त आणि अविचारी वृत्तीने पर्यावरणाचा बेसुमार वापर करून त्याचा र्‍हास केल्यामुळे अनेक जटील समस्या निर्माण झाल्या आहेत. पर्यावरणीय व्यवस्थेत असंतुलन निर्माण होऊन प्राणीमात्रास धोका उत्पन्न होत आहे. मानवाच्या अविचारी वागण्यामुळे जल, हवा, ध्वनी, भूप्रदूषणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. औद्योगिक व रासायनिक दुषितीकरणामुळे विविध प्रकारचे आजार वाढत आहेत. ओझोन वायूचा क्षय, आम्लपर्जन्य, सागरी परिसंस्थेचा असमतोल, प्राणी व पक्षी नामशेष होणे, नागरीकरण, वाळवंटीकरण इत्यादी समस्येसोबत वातावरणात आकस्मिक बदल हे नित्याचेच झाले. त्यामुळे रोज नवे संकट आपणांसमोर तोंड वासून उभे होत आहे. या सर्व समस्यांपासून सुटका करून घेण्यासाठी प्रत्येकांनी सावधरित्या पाऊल उचलणे गरजेचे आहे.

सर्वप्रथम मी पर्यावरणाचा एक घटक आहे. याचे भान प्रत्येकाने ठेवणे गरजेचे आहे. ज्याप्रकारे कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती कुटुंबाचा एक घटक असल्याचे भान ठेऊन वागतो, त्यामुळेच त्या कुटुंबात सुख, समृद्धी व स्थिरता दिसून येते. कुटुंबातील एक जरी व्यक्ती बेजबाबदारपणे वागली तर संपूर्ण कुटुंबाला त्याचे फळ भोगावे लागते. पर्यावरणाचे सुद्धा थोडेफार तसेच आहे. असे वाटत नाही काय? तसेच पर्यावरणाचे माझ्यावर फार मोठे कर्ज आहे आणि ते कर्ज मला फेडायचे आहे हे ही ध्यानात असू द्यावे. पर्यावरणाचा र्‍हास होण्यामागे वाढती लोकसंख्या हे एक प्रमुख कारण आहे. कुंटुंबातील संख्या वाढू लागली की त्यांची घरे वाढतात आणि घरे बांधण्यासाठी जमिन अधिग्रहण करणे व झाडे तोडणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे जंगलतोड होऊन मानवाची वस्ती वाढू लागते आणि पर्यावरणाचा समतोल बिघडतो. त्यासाठी कुंटुंब नियोजन सारख्या कार्यक्रमाचा प्रचार व प्रसार अधिक वेगात करणे आवश्यक आहे. लोकसंख्येला आळा घातल्याशिवाय आपली कोणतीही प्रगती शक्य नाही व आपला देश महासत्ता होणार नाही.

पर्यावरणातून आपणांस हवा, पाणी आणि नैसर्गिक समृद्धी मिळते ज्याद्वारे आपण चांगले जीवन व्यतीत करू शकतो. अन्नाशिवाय मनुष्य एखादा दिवस जगू शकतो परंतु पाण्यावाचून तो जगू शकत नाही. मात्र मानवाने पाण्याचा उपसा करीत त्याचा गैरवापर केल्यामुळे आज देशात पाण्याची समस्या खुपच गंभीर बनत चालले आहे. देशातल्या एका भागात पाण्याने लोकं मरतात तर दुसर्‍या भागात पाण्यावाचून लोक तडफडून मरतात. काही लोक पाण्याचा पैसा करतात तर काही लोक पाण्यासाठी पैसे मोजतात. तीस एक वर्षापुर्वी जर असे म्हटले गेले की, लोक पाणी विकून पैसा करतात. या वक्तव्यावर ते लोक हसत होते आणि पाणी कोण विकत घेणार? असा सवाल करीत. परंतू आज तेच लोक पैसे देऊन पाणी विकत घेत आहेत. खरोखरच पाण्याच्या या व्यवहाराने पर्यावरणाचा पूर्णतः समतोलपणा बिघडविला आहे. या बाबीकडे शासनाने गंभीरतेने लक्ष देणे गरजेचे आहे. पाण्याची बचत व त्याचा काटकसरीने वापर करण्याची सवय प्रत्येकांनी अंगीकारणे अत्यंत आवश्यक आहे. पाणी अडवा पाणी जिरवा यासारखे उपक्रमाची प्रत्येकांना जाणीव करून देणे व ज्या ठिकाणी सदरील उपक्रम यशस्वी झाले आहे अशा राळेगण सिद्धी किंवा हिवरे बाजार याठिकाणी भेटीचे प्रत्येकांनी करावे.

आपण अन्नाशिवाय एखादा दिवस, पाण्यावाचून एखादा तास जिवंत राहू शकतो मात्र हवेतील ऑक्सिजन शिवाय क्षणभर सुद्धा जिवंत राहू शकत नाही. आणि ऑक्सिजन निर्मितीचे सर्वात मोठे कार्य वृक्ष करीत असतात. वनस्पती स्वतःचे अन्न स्वतः तयार करतात आणि हवेतील कार्बन डायक्साईड म्हणजे खराब हवा वायू शोषून मानवास उपयुक्त असे ऑक्सिजन म्हणजे शुद्ध हवा वायू हवेत सोडतात. त्यामुळे वनस्पती व वृक्षांची लागवड व संवर्धन करणे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. जंगलतोड फार मोठ्या प्रमाणावर होतांना जंगल वाचविण्यासाठी व लोकांमध्ये वृक्षाविषयी जागृती निर्माण करण्यासाठी सुंदरलाल बहुगुणा यांनी ''चिपको आंदोलन'' चालविले आणि त्यात यशस्वी सुद्धा झाले. वृक्षांचे महत्व अपरंपार आहे, हे आपल्या पूर्वजांनी सुद्धा जाणून होते. संत तुकाराम महाराज याविषयी म्हणतात की, ''वृक्षवल्ली, आम्हां सोयरे, वनचरे, पक्षी ही सुस्वरे आळविती.'' खरंच वृक्ष हे आपले सगे सोयरे, नातलग, मित्र परिवारातीलच नव्हे कां? वृक्षांच्या महत्वाविषयी आपले पूर्वज संत, महात्मे आणि समाजसुधारकांनी ज्या बाबी सांगितल्या आहेत ते सामान्यांतल्या सामान्य लोकांपर्यंत पोहोचविणे अत्यंत महत्वाचे आहे.

जंगलतोड वाढत चालल्यामुळे दिवसेंदिवस वनाचे क्षेत्र कमी कमी होत आहे. त्यामुळे जंगलात वास्तव करून राहणारे पशू - पक्षी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. काही वर्षांनी फक्त झू पार्क मध्येच एखादा प्राणी - पक्षी बघायला मिळेल की काय अशी शंका मनात येते. पूर्वी सकाळी पक्ष्यांच्या चिवचिव - किलबिल आवाजाने जाग यायची. आजही त्याच आवाजाने जाग येते. मात्र आजचा आवाज नैसर्गिक नसून ती मोबाईलची रिंगटोन असते. मोबाईलमुळे खूप दूरवरचे मित्र, कुटुंबातील सदस्य, नातलग आणि पाहुणे हे सर्व आपल्याजवळ असल्यासारखा भास होत आहे आणि आपल्या सहवासात असलेला निसर्ग मात्र दूर गेले आहे. त्यास्तव निदान वनाचे संरक्षण करण्यात आपण यशस्वी झालो तर पशू-पक्ष्यांचे आपोआप संरक्षण होईल. आपल्या जीवनाप्रमाणे पशू-पक्ष्यांचे जीवनसुध्दा महत्वाचे आहे हे विसरून चालणार नाही

आपला देश हा शेतीप्रधान देश आहे. येथील एक तृतियांश जनतेचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. अधिक उत्पन्न काढण्याच्या स्वार्थासाठी शेतकरी आपल्या शेतीची जुनी पध्दत बंद केली असून, रासायनिक औषध व खताचा बेसुमार वापर करीत आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस जमिनीचा कस तर नष्ट होतच आहे. शिवाय त्या रासायनिक घटकांचा प्रतिकूल परिणाम मानवाच्या आरोग्यावर होऊन हानी पोहोचत आहे. डीडीटी या किटकनाशक औषधाचा अति वापर केल्यामुळे कीटकनाशक मानवाच्या शरीरात कशी पोहोचतात आणि ते पुढच्या पिढीत कसे संक्रमित होतात याचे सत्य कॉर्सने सन १९६२ मध्ये सायलेंट स्प्रिंग या पुस्तकाद्वारे जगासमोर मांडले होते. उत्पादन कमी निघाले तरी चालेल परंतु रासायनिक औषध व खताचा अनावश्यक वापर टाळून सेंद्रीय खताचा वापर प्रत्येक शेतकऱ्यांनी करायला पाहिजे. सर्वच शेतकऱ्यांनी आपली संघटना तयार करून सेंद्रीय पध्दतीने शेती करण्याचे ठरविले तरच सर्वांना त्याचा फायदा होतो, हे लक्षात घ्यावे.

नैसर्गिक साधनसंपत्तीमध्ये सौर ऊर्जा हे कधीही न संपणारी संपत्ती आहे. भविष्यात सौर उर्जेच्या वापरात वाढ करणे म्हणजे एकप्रकारे पर्यावरणाला हातभार लावण्यासारखे आहे. पेट्रोल, डिझेल यासारख्या इंधनाचा मर्यादित साठा भविष्यकाळात संपण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचा जपून वापर करण्यातच शहाणपणा आहे. सोबतच अमर्यादित अश्या सौर उर्जेचा इंधनासाठी पर्याय म्हणून वापर करण्यासाठी सुरुवात केल्यास भविष्यातील अनेक संकटापासून मुक्तता मिळू शकेल. आज ज्या सौर उर्जेचा वापर नगण्य स्वरूपात आहे, म्हणजेच पूर्णपणे वाया जात आहे. त्याचा अनेक माध्यमातून विविध साधनाच्या मदतीने वापर करता येऊ शकते आणि पर्यावरणाचा असमतोल थांबविता येऊ शकेल. सौर बंब, सौर चूल, आणि सौर उर्जेवर चालणाऱ्या विविध उपकरण यांचा जनतेनी जास्तीत जास्त वापर कसे करू शकतील? यांविषयी शासनाने महत्वाचे फायदेशीर निर्णय घेणे अपेक्षित आहे.

---

**(पान १ वरून) अपघात टाळण्यासाठी**

निवासी उपजिल्हाधिकारी श्री.पवार म्हणाले की, रस्त्यावरील अपघात टाळण्यासाठी सुरक्षा उपाययोजना राबविण्यावर भर द्यावा. अपघात प्रवण ठिकाणी दिशादर्शक व सूचना फलक लावावेत. अनावश्यक ठिकाणी असलेले गतीरोधक काढण्यात यावेत. नागरिकांनी मागणी केलेल्या ठिकाणी गतीरोधक बसविण्यात यावेत. रस्ते, महामार्गावर रबलिंग पट्टे तयार करावेत. राष्ट्रीय महामार्गावरील अनाधिकृत ढाबे, हॉटेल, अनाधिकृत पार्कीग काढण्यात यावीत. रस्त्यावरील डिव्हाईडर काढणाऱ्यावर गुन्हे दाखल करावे. महापालिकेने जुना आग्रावरील नैसर्गिक नाल्यावरील अतिक्रमण पावसाळ्यापुर्वी काढावेत. महामार्गावरील टेल लाईट, हेट लाईट नसणाऱ्या वाहनधारकावर कारवाई करावी. आपत्तीकाळात मदतीसाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने रुग्णवाहिका उपलब्ध करुन द्यावी.राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम, राष्ट्रीय महामार्ग व महानगरपालिका अभियंते व प्रादेशिक परिवहन विभाग अधिकारी, पोलीस अधिकारी यांनी संयुक्तिक प्रत्येक ब्लॅक स्पॉट बघून अहवाल सादर करावा. यावेळी जिल्ह्यातील ६७ ब्लॅक स्पॉटवर चर्चा करण्यात आली. तसेच अपघात कमीत कमी होईल याची दक्षता घेण्याच्या सूचना निवासी उपजिल्हाधिकारी श्री.पवार यांनी दिल्यात.

**(पान १ वरून) आर.सी.पटेल...**

डॉ. वैशाली पाटील, एम.सी.ए. व आय.एम.सी.ए. विभागप्रमुख डॉ.मनोज बेहेरे, आय.क्यु.ए.सी. समन्वयक व एम.एम.एस. विभागप्रमुख डॉ. मनोज पटेल, पदवी विभागप्रमुख डॉ. तुषार पटेल, प्रा. भाग्यश्री पाटील, प्रा. हर्षदा चौधरी, डॉ. रुपाली अग्रवाल, रजिस्ट्रार प्रा. सुमित सगळे, डी.यु.चौधरी, विशाल माहेश्वरी, कविता पाटील, निलिमा पाटील, धिरज शेटे, दिपक बोरसे, किशोर सोनवणे, दिपक दोरीक, सचिन नवले, मिलिंद इंदासराव यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## धुळे महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत धुळे महानगरपालिका मार्फत खुल्या जागा धारकांना स्वच्छ करण्याबाबत नोटीस

धुळे - महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत घरातील स्वच्छता विषयी शहरातील खुल्या जागेत मोठ्या प्रमाणात अस्वच्छता व झाडे, गवत उगवले असल्याचे निदर्शनास आले होते. त्याचप्रमाणे येत्या काही दिवसात पावसाला सुरुवात होणार आहे. त्यानुसार शहरातील खुल्या जागेतील मालमत्ताधारकांना आपल्या जागेची स्वच्छता न केल्यास सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण होऊन रोगराई होण्याची शक्यता आहे. त्यानुसार आयुक्त नितीन कापडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम संपूर्ण शहरात राबविण्यात येत आहे अशा ओपन प्लॉट धारकांना नोटीस बजावण्यात येत असून नोटीस मिळाल्यापासून मिळाल्यापासून ७ दिवसाच्या आत संपूर्ण जागेची स्वच्छता करून घेण्याबाबत कळवण्यात आलेले आहे

याबाबत संबंधित प्लॉट धारकाने स्वच्छता न केल्यास भारतीय न्याय सहिंता कलम २७१,२७२,२८०,२९२ व २९३ अन्वे गुन्हा दाखल करण्यात येईल व दंडात्मक कारवाई करण्यात येईल याबाबत नोटीस बजावण्यात येत आहे. सदर नोटीस शहरातील १९ प्रभागांमध्ये स्वच्छता निरीक्षक मार्फत खुल्या जागेतील मालमत्ता धारक नागरिकांना बजावण्याचे काम सुरू करण्यात आलेले आहे. यासाठी सर्व स्वच्छता निरीक्षक यांना नोटिसांचे रजिस्टर देण्यात आलेले आहे. सदर कारवाई आयुक्त नितीन कापडणीस यांच्या निर्देशानुसार उपायुक्त मनोज वाघ यांनी दिलेल्या कृती आराखडा प्रमाणे तसेच मुख्य स्वच्छता निरीक्षक राजेश वसावे लक्ष्मण पाटील सर्व स्वच्छता निरीक्षक मुकादम यांच्याद्वारे नोटीस बजावण्यात येत आहे.

# डेंग्यू आजाराला प्रतिबंध करण्यासाठी नागरीकांनी सहकार्य करावे–जिल्हा हिवताप अधिकारी अनिल पाटील

धुळे (जिमाका) – डेंग्यू हा डासांमुळे पसरणारा विषाणूजन्य आजार आहे. एडिस इजिप्टास या प्रकारच्या डासांच्या विषाणू संसर्गित मादीच्या चावण्यामुळे या आजाराची लागण होते. डेंग्यू संसर्गित व्यक्तीस डास चावल्यावर डास सांसर्गिक होतो. तोच संसर्गिक डास निरोगी व्यक्तीस चावल्यास त्या व्यक्तीला डेंग्यूचा संसर्ग होतो. या आजाराच्या प्रतिबंधासाठी नागरिकांनी साठवलेल्या पाण्याचे योग्यप्रकारे व्यवस्थापन करावे आणि डासांच्या उत्पत्तीची ठिकाणे निर्माण होऊ देऊ नये, तसेच आवश्यक दक्षता बाळगून आरोग्य यंत्रणेला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा हिवताप अधिकारी अनिल पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये केले आहे.

श्री. पाटील यांनी म्हटले आहे की, धुळे जिल्ह्याची भौगोलीक परिस्थिती पाहता धुळे जिल्हास लागून मध्यप्रदेश व गुजरात राज्य आहेत. हे राज्य लगत असल्याने धुळे जिल्ह्यातून मजूरांचे स्थलांतर सतत चालू असते. तसेच कारखाने, बांधकामे, सिंचन प्रकल्प, तसेच वाढते शहरीकरणामुळे डेंग्यूच्या रुग्ण संख्येत वाढ होतांना दिसत आहे. राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत १६ मे रोजी राष्ट्रीय डेंग्यू दिन म्हणून साजरा करण्यात येतो. डेंग्यू आजाराविषयी जनतेमध्ये जागृती निर्माण होऊन डेंग्यू आजाराने होणारे मृत्यूचे प्रमाण कमी करण्यास शासनास यश आले आहे. डेंग्यू हा डासामुळे पसरणारा विषाणुजन्य आजार आहे. एडिस इजिप्टाय प्रकारच्या डासांच्या विषाणू संसर्गित मादीच्या चावण्यामुळे या रोगाची लागण होते. डेंग्यू संसर्गित व्यक्तीस डास चावल्यावर वरील प्रकारचा डास संसर्गिक होतो. त्यानंतर तोच संसर्गिक डास निरोगी व्यक्तीस चावल्यास त्या व्यक्तीला डेंग्यूचा संसर्ग होतो. डास चावल्यानंतर साधारणतः पाच ते सात दिवसानंतर डेंग्यू आजाराची लक्षणे दिसायला लागतात. या वर्षाचे घोषवाक्य Community Participation Dengue Contro:Check,Clean and Cover आहे. डेंग्यू ताप हा फ्लयू सारखाच ताप आहे. तो डेंग्यू–१, डेंग्यू– २, डेंग्यू–३, डेंग्यू–४ या विषाणूपासून होतो. एडिस डासांची वैशिष्टये अशी : एडिस डासांची लांबी ५–६ मि.मि. असते. या डासाच्या अंगावर पाढरे पट्टे असतात. त्यामुळे त्याला टायगर मॉस्क्यूटो असेही म्हणतात. हा डास दिवसा चावतो. हा डास लोंबकळणाऱ्या वस्तू उदाः दोरी, वायर, छत्री, काळे कपडे इत्यादी ठिकाणी विश्रांती घेतो. या डासांची अंडी वर्षभर पाण्याशिवाय राहू शकतात. वर्ष भरानंतर पाणी उपलब्ध होताच त्यामधून पुन्हा अळी तयार होते. त्यामुळे डास अळी असलेली भांडी घासून– पुसून धुवून स्वच्छ ठेवावीत. जेणेकरुन त्याची पृष्ठभागाला चिकटलेली अंडी नष्ट होतील.

डेंग्यू आजाराची लक्षणे: तीव्र ताप, डोके दुखी, उलटी, अंगदुखी, डोळ्याच्या खोबणीमध्ये दुखणे, अंगावर लालसर पुरळ, तीव्र पोट दुखी आणि गंभीर रुग्णास रक्तस्त्राव.

डासाची उत्पत्ती रोखण्याचे उपाय : परिसर स्वच्छता– घराभोवती,परिसरात ज्यामध्ये पाणी साचू शकेल अशा निरुपयोगी वस्तू साचू देवू नयेत. त्या नष्ट कराव्यात. खराब टायर्स पंक्चर करावेत. पंक्चर दुकानातील टायर्स त्यात पाणी साठणार नाही, अशा पध्दतीने रचावेत. पाण्याची भांडी, ड्रम, रांजण व्यवस्थित झाकून ठेवावेत. पाण्याची भांडी झाकल्याने त्यात डास अंडी घालू शकत नाही. तसचे अंड्यांची वाढ होण्यासाठी हवा, प्रकाश मिळू शकत नाही. झाकण नसल्यास जुन्या कपड्याने झाकावेत. छतावरील टाक्यांना घट्ट झाकणे बसवावीत, पाण्याचे साठे कपडयाने झाकावेत. शौचालयाच्या व्हेंट पाइपला जाळी अथवा कापड बांधावे. आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस म्हणून पाळावा.

या दिवशी घरातील सर्व भांडी कोरडी करुन घासून–पुसून घ्यावीत. परिसरातील डबकी वाहती करावीत किंवा बुजवावीत. मोठ्या डबक्यात गप्पी मासे सोडावीत. तसेच परिसर स्वच्छ ठेवावा. जे कंटेनर रिकामे करता येणार नाहीत अशांमध्ये टेमिफॉस या अळी नाशकाचा वापर करावा.

जैविक नियंत्रण पध्दतीने डास निमिर्ती होवू न देणे, डासोत्पत्ती स्थाने नष्ट करणे, गप्पी माशांचे संगोपन करणे. कायमस्वरुपी डासोत्पत्ती स्थानात गप्पी मासे सोडावीत. फुटके माठ, रांजण, कुंड्या, डबे, बाटल्या, निकामी टायर्स इत्यादींची योग्य ती विल्हेवाट लावावी किंवा त्यात पाणी साठू देवू नये. कुलरमधील पाणी, फ्रिजच्या डिस्फ्रॉस्टिंग ट्रेमधील पाणी, फुलदाण्यांमधील पाणी आठवड्यातून एकदा स्वच्छ करावे. पाण्याचे साठे व्यवस्थित झाकणाने अथवा कापडाने झाकावेत. आरोग्य शिक्षणावर भर द्यावा.

डासांपासून संरक्षणासाठी मच्छरदाणीचा वापर करावा. वैयक्तिक सुरक्षेतेसाठी झोपताना विशेषतः किटकनाशक भारित मच्छरदाणीचा वापर करावा. डास प्रतिबंधक मलम / अगरबत्ती वापरावी. घराच्या खिडक्यांना बारीक जाळीचे पडदे लावावेत. डासांच्या अळ्या खाणारे गप्पी मासे हौदात, विहिरीत व डबक्यात सोडावेत. तसेच डेंग्यू तापाची लागण झाल्यास डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पॅरासिटेमॉल गोळ्यांचा वापर करावा, तसेच रक्ताची/रक्तजल नमुन्याची तपासणी करुन घ्यावी व तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानेच औषधोपचार घ्यावेत.

विशेष महत्वाचे डेंग्यूच्या विषाणू विरोधात विशिष्ट अशाप्रकारचा औषधोपचार उपलब्ध नसल्याने त्या विषाणूचा प्रादुर्भाव रोखणे शक्य होत नाही. मात्र, डेंग्यू प्रसारक एडीस इजिप्ती डासांची उत्पत्ती रोखणे आपल्याला शक्य असल्याने, डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी एडीस इजिप्ती डासांची उत्पत्ती रोखणे हाच एकमेव मार्ग आहे. त्यासाठी प्रत्येकाचा वैयक्तिक सहभाग त्यामध्ये असणे आवश्यक आहे, असेही जिल्हा हिवताप अधिकारी श्री. पाटील यांनी म्हटले आहे.

## आरोग्य विज्ञान विद्यापीठात छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी




नाशिक – महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांनी प्रतिमेस अभिवादन केले.

याप्रसंगी जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील तोरणे यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्याची माहिती दिली. याप्रसंगी, श्री. वाय.जी. पाटील, डॉ. महेंद्र पटाईत, श्री. तुषार सलाम, श्री. प्रशांत पवार, श्री. जगदीश सुंदर्डे, श्री. प्रल्हाद शेलमोकर, श्री. कृष्णा भवर, श्री. आबाजी शिंदे, श्री. नंदन वाघ, श्री. आनंत शिंदे, श्री. विजय सोनवणे, श्री. रोशन चक्रवर्ती, श्री. शांताराम गुंजाळ, श्री. संजय सुराणा, श्रीमती मंगल जाधव, श्री. भास्कर आभाळे, श्री. दिलीप राजपूत आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेच्या वेळापत्रकात बदल

धुळे (जिमाका) – महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत रविवार महाराष्ट्र शिक्षण पात्रता (च–क–ढ्ढढ)–२०२६ परीक्षेचे २१ जून, २०२६ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्याऐवजी २८ जून, २०२६ रोजी घेण्यात येणार आहे. अशी माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आयुक्त अनुराधा ओक यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. महाराष्ट्र शिक्षक पात्रता (च–क–ढ्ढढ) – २०२६ परीक्षेचे रविवार २१ जून २०२६ रोजी आयोजन करण्यात आले होते. तथापि २१ जून, २०२६ रोजी NEET या परीक्षेचे आयोजन National Testing Agency (NTA) मार्फत संपूर्ण देशभरात विविध केंद्रावर करण्यात आलेले असून दोन्ही परीक्षांची बहुतांशी केंद्र एकच येत असल्याने महाराष्ट्र शिक्षक पात्रता (च–क–ढ्ढढ) २०२६ सुरळीतपणे पार पाडण्यासाठी व परीक्षार्थी हित लक्षात घेता महाराष्ट्र शिक्षक पात्रता (MAH-TET) – २०२६ परीक्षेचे आयोजन २१ जून, २०२६ त्याऐवजी रविवार २८ जून, २०२६ रोजी करण्यात आले आहे. परीक्षासाठी प्रवेशपत्र ऑनलाईन प्रिंट काढयासाठी १६ जून, २०२६ ते २८ जून, २०२६, शिक्षक पात्रता परीक्षा पेपर– पहिला रविवार २८ जून, २०२६ वेळ १०.३० ते १३.०० पर्यंत, शिक्षण पात्रता परीक्षा पेपर– दुसरा रविवार २६ जून,२०२६ वेळ १४.३० ते १७.०० पर्यंत यावेळेत होणार आहे. काही प्रशासकीय अडचणीमुळे सदर वेळापत्रकामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परीक्षार्थ्यांसाठी अद्यावत माहिती परिषदेच्या https://mahatet.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी केली जाईल याची परीक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी. असेही महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आयुक्त श्रीमती ओक यांनी कळविले आहे.

हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय – घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे – ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर – भ्रमणध्वनी – ९४२२७९८०९३ / ९०८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार – ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखाणाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)